
# सत्पुरुष लक्षणे

## स्वाध्याय

अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.



**उत्तर:** १. संकटकाळी धैर्याने वागणे.

२. स्वत:कडे श्रेष्ठत्व असले तरी सहिष्णुता बाळगणे.


३. सभेमध्ये पांडित्याचा प्रसार करणे.

४. युद्धभूमीवर शौर्य / पराक्रम गाजविणे.

५. स्वकीर्तीबाबत दक्ष असणे.

६. विद्येत रमण्याचे व्यसन असणे.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. यांच्या देहबोलीतून, मनातून व वाणीतून सुवचने, अमृत पाझरते.

२. यांच्या परोपकारांची थोरवी सर्वत्र पसरलेली असते.

३. लोकांचे परमाणूएवढे गुण मेरू पर्वताएवढे मानून त्यांची प्रशंसा करतात.

४. यांचे मन कायम संतुष्ट असते.

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१. **प्रभुपणि हे बरवे असते** → [ ]

२. **सत्पुरुष या चांगल्या व्यसनात रममाण होतो** → [ ]

**उत्तर:** १. सहिष्णुत्व  २. विद्यार्जन

**कृ.४. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. 'सत्पुरुषलक्षणे' ही कविता कवी _______ यांची आहे.
(वामन पुरोहित / रामन पंडित / वामन पंडित / वमन पंडित)

२. 'सत्पुरुषलक्षणे' ही कविता _______ या ग्रंथातून उद्धृत केली आहे.
(नवनीत अथवा मराठी कवितांचे वेचे / नवनीत अथवा प्राचीन कवितांचे वेचे / नवनीत अथवा प्राचीन मराठी कवितांचे वेचे / नवनीत अथवा नूतन मराठी कवितांचे वेचे)

३. तयांचे हे _______ गुण सहा सत्पुरुष जे।।
(नैसर्गिक / स्वाभाविक / सार्वत्रिक / वैयक्तिक)

४. _______ तोषहि पावती सु-जन ते नेणों किती नांदती।।

(चित्तीं / हृदयी / मनी / अंत:करणी)

**उत्तर:** १. वामन पंडित

२. नवनीत अथवा मराठी कवितांचे वेचे

३. स्वाभाविक

४. चित्तीं

## कृ.५. खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. लोकांचे परमाणु-तुल्य गुण सत्पुरुष _______

अ. हिमालयाप्रमाणे वाखाणतो.

ब. मेरू पर्वताप्रमाणे वाखाणतो.

क. कस्पटाप्रमाणे तुच्छ लेखतो.

ड. अरवली पर्वताप्रमाणे वाखाणतो.

२. सत्पुरुषाचा देह, मन, वचने _______

अ. माधुर्याने भरलेले असते.

ब. सद्गुणांनी भरलेले असते.

क. दयेने भरलेले असते.

ड. पुण्यामृताने भरलेले असते.

**उत्तर:** १. लोकांचे परमाणु-तुल्य गुण सत्पुरुष **मेरू पर्वताप्रमाणे वाखाणतो.**

२. सत्पुरुषाचा देह, मन, वचने **पुण्यामृताने भरलेले असते.**

**कृ.६. सत्य विधान शोधून लिहा.**

सत्पुरुषांचे वर्तन असे नसते –

अ. संकटकाळी धैर्याने सामना करणे.

ब. पराकोटीची सहनशीलता बाळगणे.

क. लोकांच्या परमाणूइतक्या चुकांचे प्रदर्शन करणे.

ड. कायम संतुष्ट असणे.

**उत्तर:** लोकांच्या परमाणूइतक्या चुकांचे प्रदर्शन करणे.

**कृ.७. असत्य विधान शोधून लिहा.**

सत्पुरुषाची लक्षणे कवी सांगतात जसे –

अ. संकटकाळी धैर्याने वागणे.

ब. ज्ञानार्जन व ज्ञानसंवर्धन करणे.

क. स्वत:च्याच तोंडाने स्वत:ची स्तुती करणे.

ड. आपल्या शौर्याचे कौशल्य रणांगणावर प्रकट करणे.

**उत्तर:** स्वत:च्याच तोंडाने स्वत:ची स्तुती करणे.

## क्र.८. कवितेवर आधारित प्रश्न

**१. 'विपत्काळीं धैर्य, प्रभुपणि सहिष्णुत्व बरवें।' या काव्यपंक्तीतून कवी काय सांगू इच्छितात?**

**उत्तर:** कवी वामन पंडित यांच्या 'सत्पुरुषलक्षणे' या काव्यवेच्यात त्यांनी सत्पुरुषाची सहा लक्षणे वर्णन केली आहेत. त्यांपैकी धैर्य व सहिष्णुता या दोन गुणांचे वर्णन वरील पंक्तीत आले आहे. संकटकाळी जो धैर्याने संकटाला सामोरा जातो व ऐश्वर्यसंपन्न असताना म्हणजेच मोठेपणा प्राप्त झाला असताना जो सहिष्णुता दाखवतो तो खरा सत्पुरुष असे कवी वामन पंडित म्हणतात.

**२. 'लोकांचे परमाणु-तुल्य गुण जे मेरूपरी वानिती।' या ओवीचा आशय स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'सत्पुरुषलक्षणे' या काव्यवेच्यात कवी वामन पंडित यांनी सत्पुरुषाची लक्षणे कथन केली आहेत. वरील श्लोकात ते म्हणतात, दुसऱ्यांच्या परमाणूइतक्या सूक्ष्म गुणांना मेरू पर्वताएवढे भव्य मानून त्यांची जे प्रशंसा करतात, ते खरे सत्पुरुष असतात. इतरांचे छोटे छोटे गुण वाखाणण्यातही सत्पुरुषांना संतोष वाटतो.

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. धैर्य : साहस : : [ ] : ज्ञान

२. पाप : पुण्य : : [ ] : असहिष्णू

**उत्तर:** १. विद्या २. सहिष्णू

**कृ.२. खालील शब्दांना पर्यायी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| समर | पांडित्य | चित्त | कीर्ती |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ |
| विभव | शौर्य | स्वाभाविक | बरवे |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| ५ | ६ | ७ | ८ |

**उत्तर:** १. युद्ध २. विद्वत्ता

३. मन ४. प्रसिद्धी

५. वैभव ६. पराक्रम

७. नैसर्गिक ८. चांगले

**कृ.३. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. अमृत : [ ] [ ]

२. कीर्ती : [ ] [ ]

**उत्तर:** १. अमृतमहोत्सव, अमृतवर्षाव

२. कीर्तिवान, कीर्तिरूपी

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | कीर्तीच्या | | |
| २. | चित्तीं | | |
| ३. | विपत्काळी | | |

उत्तर:

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | कीर्तीच्या | च्या | षष्ठी |
| २. | चित्तीं | ई | सप्तमी |
| ३. | विपत्काळी | ई | सप्तमी |

**कृ.२. वाक्यातील अधोरेखित अव्ययांचा प्रकार लिहा.**

'ज्यांची देह-मनें तशीच वचनें पुण्यामृतें ओतिलीं।
कीं ज्यांही स्व-कृतोपकार-विभवें सर्वत्र विस्तारिलीं।।'

उत्तर: कीं – उभयान्वयी अव्यय
सर्वत्र – क्रियाविशेषण अव्यय

**कृ.३. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. विपत्काळी २. सत्पुरुष

३. पुष्यामृत ४. स्वकृतोपकार

५. सुजन

**उत्तर:**

| | **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समास** |
|---|---|---|---|
| १. | विपत्काळी | विपत् (वाईट) अशा काळी | कर्मधारय समास |
| २. | सत्पुरुष | सत् (चांगला) असा पुरुष | कर्मधारय समास |
| ३. | पुण्यामृत | पुण्य (शुद्ध) हेच अमृत | कर्मधारय समास |
| ४. | स्वकृतोपकार | स्वत: कृत् (केलेले) उपकार | कर्मधारय समास |
| ५. | सुजन | सु (चांगले) असे जन | कर्मधारय समास |

**कृ.४. खालील शब्दांचे वचन बदला.**

१. सत्पुरुष २. देह

३. वचन ४. गुण

**उत्तर:** १. सत्पुरुष २. देह

३. वचने ४. गुण

**कृ.५. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. किर्ती | कीर्ति | कीर्ती | किर्ति

२. विपत्काळीं | वीपत्काळी | विपतकाळी | विप्तकाळी

३. सहिष्णुत्व | सहीष्णुत्व | सहिष्णूत्व | सहीष्णूत्व

४. सत्पुरुष | सप्तपुरुष | सप्तुरुष | सत्पुरूष

**उत्तर:** १. कीर्ती    २. विपत्काळीं

३. सहिष्णुत्व    ४. सत्पुरुष

## ड. माझे मत

**कृ.१. वामन पंडित यांनी सांगितलेल्या सत्पुरुषाच्या लक्षणांचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.**

**उत्तर:** 'सत्पुरुषलक्षणे' या काव्यवेच्यात वामन पंडित यांनी मोजक्या शब्दांत सत्पुरुषाच्या सहा लक्षणांचे वर्णन केले आहे.

त्यांच्या मते, जो संकटसमयी अतुलनीय धैर्य दाखवितो, जो ऐश्वर्य प्राप्त झाले असताही संपत्तीचा, मोठेपणाचा गर्व न करता सहिष्णुता धारण करतो, जो सभेमध्ये धीटपणे आपल्या विद्वत्तेचा (पांडित्याचा) प्रसार करतो, जो रणांगणावर पराक्रम गाजवून शौर्य दाखवतो, जो आपल्या स्व-कीर्तीबाबत दक्ष असतो, ज्याला ज्ञानार्जनाची अत्यंत आवड आहे, विद्या संपादन करणे ज्याचे व्यसन आहे, अशा सर्व गुणांनी संपन्न तो सत्पुरुष होय.

अशा प्रकारे, 'सत्पुरुषलक्षणे' या काव्यवेच्यात 'वामन पंडित' यांनी मोजक्या शब्दांत सत्पुरुषाच्या सहा लक्षणांचे वर्णन केले आहे.

**कृ.२. तुमच्या मते कोणकोणत्या गुणांमुळे मनुष्याला 'सुजन' संबोधले जाते?**

**उत्तर:** 'सुजन' संबोधले जाण्यासाठी मनुष्याच्या ठायी अनेक गुण असणे आवश्यक आहे. सुजन मनुष्य दुसऱ्यांच्या सुखात सुख मानतो, दुसऱ्यांच्या दु:खाने दु:खी होतो. तो मत्सर, दंभ, ईर्षा या विकारांपासून दूर असतो व सर्वांचे हित चिंततो. तो सदैव सत्याची कास धरतो व असत्य, अधर्म या गोष्टींपासून दूर राहतो. सध्याच्या वेगवान स्पर्धेच्या काळातही तो स्वत:शी स्पर्धा करतो व इतरांच्या गुणांचे मनापासून कौतुक करतो. तो स्वत:मधील गुणांची वृद्धी करण्यासाठी झटतो व सचोटीपूर्ण मार्ग निवडून प्रगती करतो. काम, क्रोध, मोह यावर त्याने नियंत्रण मिळविलेले असते. तो सर्वांचा आदर करतो; पण त्याचवेळी दुर्जनांना योग्य ते शासनही करतो. माझ्या मते हे गुण असलेली व्यक्ती 'सुजन' या संबोधनासाठी पात्र असते.